# सायबर फ्रॉड; आम्ही सतर्क, तुम्हीही जागरूक राहा !

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** अलीकडे सायबर फसवणुकीच्या घटना वाढल्या असून आम्ही सतर्क आहोत, तुम्हीही जागरूक राहा, अशी समाजातील वंचित घटकांमध्ये जनजागृती करणाऱ्या विद्यार्थ्यांना अंधेरीतील वालिया कॉलेज येथे सायबर शिक्षा अवॉर्ड्स देऊन सन्मानित करण्यात आले. शैक्षणिक संस्था, शिक्षक आणि त्यांच्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. शैक्षणिक संस्थांमध्ये आसनगाव येथील अलामुरी रत्नमाला इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, केआयएचईएसचे महाराष्ट्र कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स, व्हीपीएमचे बी. एन. बांदोडकर कॉलेज ऑफ सायन्स आणि वालिया सी. एल. कॉलेज ऑफ कॉमर्स व एल. सी. वालिया कॉलेजचा समावेश होता.